**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार, दिनांक ०६ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **अभिजात भाषेचा दर्जा मिळणं हा मराठीसाठी सोनेरी क्षण असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक उद्या नवी दिल्ली इथं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली होणार.**
3. **केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज विविध विकास कामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण.**
4. **दिल्ली इथं होणाऱ्या ९८ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोक साहित्याच्या अभ्यासक डॉ.तारा भवाळकर यांची निवड.**
5. **दुबईत सुरू असलेल्या महिलांच्या २० षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत पाकिस्तानचं भारतापुढे विजयासाठी १०६ धावांचं लक्ष्य.**

अभिजात भाषा

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आल्यानिमित्त काल मुंबईत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मराठी भाषा सन्मान सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. अभिजात भाषेचा दर्जा मिळणं हा मराठीसाठी सोनेरी क्षण असल्याचं या सोहळ्याला संबोधित करताना ते म्हणाले.

***केंद्र सरकारने आमच्या मराठी भाषेला अभिजात भाषेत दर्जा दिला आहे. ये केवल मराठी और महाराष्ट्र का ही सम्मान है ऐसा नहीं है, ये उस परंपरा का सम्मान है जिसने देश को ग्यान, दर्शन, अध्यात्म और साहित्य की समृद्ध संस्कृति दी है, मै इसके लिए देश और दुनिया मै मराठी बोलनेवाले सभी लोगोको बधाई देता हु ।***

दरम्यान, काल सकाळी वाशिम जिल्ह्यातल्या पोहरादेवी इथं बंजारा समाजाच्या समृद्ध परंपरेचं दर्शन घडविणाऱ्या बंजारा विरासत संग्रहालयाचं उद्घाटनही पंतप्रधान मोदी यांनी केलं. भटक्या जमातींचा विकास हा महाराष्ट्र शासनाच्या संत सेवालाल महाराज बंजारा तांडा समृद्धी अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचं त्यांनी नमूद केलं. त्यावेळी सुमारे 23 हजार 300 कोटी रुपयांच्या कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित विविध उपक्रमांचा शुभारंभ देखील मोदी यांच्या हस्ते झाला.

नक्षलप्रभावित राज्यांची बैठक

देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक उद्या नवी दिल्ली इथं केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार,

छत्तीसगड, झारखंड, तेलंगणा, ओदिशा आणि मध्य प्रदेश या राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीला उपस्थित राहतील. या राज्यांना विकास निधी प्रदान करण्यात सक्रीय सहभाग असलेले पाच केंद्रीय मंत्री देखील या बैठकीला उपस्थित राहतील. तसंच उप राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि केंद्र, राज्यं आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी देखील या चर्चेत सहभागी होतील.

विकास कामांचं भूमिपूजन

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आज पूर्व नागपुरात तब्बल 500 कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण करण्यात आलं. यावेळी राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष अँड. धर्मपाल मेश्राम, भाजप आमदार कृष्णा खोपडे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. पूर्व नागपुरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे जलतरण तलाव याशिवाय महारेलद्वारे निर्मित सेतुबंधन योजने अंतर्गत 51 कोटी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या दुमार्गी उड्डाणपुलाचं लोकार्पण, महानगर पालिका आणि स्मार्ट अँड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या मौजा-पुनापूर इथले स्मार्ट पोलीस स्टेशन, फायर स्टेशन, मल्टी स्कील डेव्हलपमेंट सेंटर आणि मल्टीलेव्हल पार्किंग, आदी विकास कामांचं लोकार्पण करण्यात आलं. यावेळी गडकरी यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

सत्र न्यायालय/फडणवीस

बुलडाणा जिल्ह्यातील खामगांव इथल्या जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीच्या कोनशिलेचं अनावरण सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई आणि उपमुख्यमंत्री तथा विधी न्यायमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आलं. या ठिकाणी सर्व सोयी-सुविधानी सुसज्ज अशा पाच मजली इमारतीचे निर्माण होणार आहे. ही प्रशस्त इमारत राज्यात तालुकास्तरावरील न्यायालयाची पहिली मोठी इमारत ठरणार आहे.

विकासकामांचे भूमिपूजन

शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जाणारा जिगाव सिंचन प्रकल्प अतिशय वेगाने पूर्णत्वाकडे नेत आहोत. हा प्रकल्प आणि वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पांमुळे खामगांवमधील गावं पाणीदार होणार आहेत. शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी येणार असल्याचं प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. खामगांव इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान येथे खामगांव विधानसभा क्षेत्रातील २ हजार ३६५ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

साहित्य संमेलन अध्यक्ष

ज्येष्ठ साहित्यिक, संशोधक आणि लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांची दिल्ली इथं होणाऱ्या ९८ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. साहित्य महामंडळाच्या पुण्यात झालेल्या बैठकीत आज हा निर्णय घेण्यात आला. १९३९ साली पुण्यात जन्मलेल्या तारा भवाळकर यांनी त्यांचं सबंध आयुष्य लोकसाहित्याच्या अध्ययन, चिंतन, संशोधन आणि लेखनासाठी समर्पित केलं आहे. १९५८ पासून अध्यापनाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉ. भवाळकर सन १९९९ ला सेवानिवृत्त झाल्या. लोकसाहित्य, लोकसंस्कृती, मराठी भाषा आणि साहित्य, नाट्यपरंपरा अशा विविध विषयांत त्यांनी मोलाची भर घातली आहे. ज्येष्ठ साहित्यिका दुर्गा भागवत आणि डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या वाटेवरून लेखन-संशोधनाचा प्रवास त्यांनी सुरू केला. भारतीय संस्कृतीतील स्त्री प्रतिमांचा धांडोळा आणि स्त्री-मनाचा शोध त्यांनी आवर्जून घेतला. लोकसाहित्याची स्त्रीवादी समीक्षा प्रस्थापित करण्यात डॉ. तारा भवाळकर यांची महत्वाची भूमिका राहिली आहे. आज त्यांची निवड झाल्यावर त्यांनी आकाशवाणीला प्रतिक्रिया दिली.

***हा सन्मान केवळ माझा नाही आहे, मी ज्या अभ्यासक क्षेत्रामध्ये काम करत आले. त्या लोकसंस्कृती आणि नाटक विशेषतः आणि स्त्रीविचार या सर्व प्रकारच्या विचारांचा आणि साहित्याच सन्मान आहे. माझ्या आधी काम केलेल्या आणि पूर्वी काम करत असलेल्या आणि या नंतर करणाऱ्या या सर्वांचा सन्मान आहे, असं मी मानते. या जीवनाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करावा आणि त्याच्यासाठी साधन म्हणून लोक परंपरेतल्या अनेक बाबींचा मला उपयोग झाल्या. जात्यांवर दळण दळणाऱ्या बायकांच्या पासून लोक परंपरेमध्ये विविध कलाविष्कार करणारे, विविध देव-देवतांच्या उपासना करणारे असे सगळे कलावंत असतील, सर्व सामान्य माणसं असतील त्यांचं जगणं असेल त्यांचे उद्योग, व्यवसाय असतील त्याचाशी निगडित त्यांचे अविष्कार असतील, या सगळ्यांचा यथा शक्य मागोवा घेण्याचा मी प्रयत्न केला आणि त्याच फलित म्हणून हे पद हा या सर्वांचा सन्मान आहे असं मी मानते.***

लाडकी बहीण योजना

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना बंद होणार नाही, असा पुनरुच्चार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. छत्रपती संभाजीनगर इथं आज मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान आणि राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. लाडकी बहीण योजनेचे नोव्हेंबर महिन्याचे पैसे देखील महिलांच्या खात्यात जमा झाले असून, लाडक्या बहिणींना लखपती करण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी चुकीचं

नॅरटिव्ह पसरवलं, आता विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणीच त्यांना उत्तर देतील, असं मुख्यमंत्री म्हणाले.

सोयाबीन

आर्थिक वर्ष 2024-25 साठी सोयाबीनचा हमीभाव हा 4 हजार 892 रुपये इतका असून, तो गेल्यावर्षीपेक्षा 292 रुपयांनी अधिक आहे. सोयाबीन खरेदीसाठी केंद्रंही सुरू करण्यात आली असून, त्यांची संख्या आणखी वाढवणार असल्याचं राज्य सरकारच्या वतीनं सांगण्यात आलं आहे.

T-२० क्रिकेट

संयुक्त अरब अमिरातीत सुरू असलेल्या महिलांच्या २० षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना पाकिस्तान संघाविरुद्ध दुबईत सुरू आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेत पाकिस्तानी महिलांनी निर्धारित 20 षटकांत 8 गडी बाद 105 धावा करीत भारतापुढे विजयासाठी १०६ धावांचं उद्दिष्ट ठेवलं. प्रत्युत्तरादाखल खेळताना आतापर्यंत भारतीय महिलांनी पाकिस्तानविरुद्ध आतापर्यंत 10 षटकात 1 गडी बाद 50 धावा केल्या आहेत. विजेतेपदाच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी भारतीय संघाला आज विजय मिळवणे आवश्यक आहे.

मध्य रेल

येत्या १४ ऑक्टोबर रोजी असलेल्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेतर्फे मुंबई, पुणे नागपूर आणि नागपूर, भुसावळ नाशिक दरम्यान विशेष गाड्या चालविण्यात येणार असल्याचं रेल्वेने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविलं आहे. या विशेष गाड्यांसाठी विशेष शुल्कासह आरक्षण दि. ७ ऑक्टोबर पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि irctc.co.in या संकेस्थळावर उपलब्ध असेल.

राष्ट्रीय पुस्तकालय मिशन

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या अधीन काम करणारी संस्था राजा राममोहन राय लायब्ररी प्रतिष्ठान, कोलकाता आणि महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रीय पुस्तकालय मिशनचा 47 वा क्षमता निर्माण कार्यक्रम उद्यापासून ते येत्या 11 ऑक्टोबर पर्यंत महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय इथं आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचं औपचारिक उद्घाटन उद्या सोमवार दि. 7 ऑक्टोबर रोजी सकाळी 10 वाजता होईल. या प्रशिक्षण कार्यक्रमात महाराष्ट्र, छत्तीसगड, तेलंगणा, गोवा या राज्यातून जवळपास 50 सार्वजनिक ग्रंथालयांचे कर्मचारी सहभाग घेतील. या कार्यक्रमातून ग्रंथालय स्वचालन सॉफ्टवेअर, गुणवत्ता पायाभूत सुविधा, संसाधने, अद्ययावत आयटीसी उपकरणे तसेच तांत्रिक, सोशल मीडिया, ग्रंथालय संसाधनांचे संरक्षण आणि आधुनिक ग्रंथालय सेवांचे व्यवस्थापन यासंबंधी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.